The Centre for Preservation and Enhancement of Regional Languages BHAASHAA

दि. ०१ जुलै २०२५

**मा. शालाप्रमुख**
स.न.

विषय : **मराठी 'भाषा' ऑलिंपियाड २०२५-२६**

प्रादेशिक भाषांच्या जतन संवर्धनासाठी गेली अठरा वर्षे 'भाषा' ही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे. विविध अभिनव उपक्रमांद्वारे भाषा- जतनाचे काम संस्था करीत आहे. मराठी भाषेत दर्जेदार लिहिती व वाचती पिढी घडावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून 'भाषा' संस्था गेली अकरा वर्षे एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे.

'मराठी भाषा ऑलिंपियाड'

ही अभिनव परीक्षा २०१५ सालापासून घेण्यात येत असून, राज्यभरातील तसेच गोवा येथील हजारो विद्यार्थी या परीक्षेचा लाभ घेतात. या परीक्षेची उपयुक्तता लक्षात घेऊन दरवर्षी राज्यातील विविध शाळांतून मागणी वाढत आहे. ही परीक्षा शाळेतच घेण्यात येत असून आपल्या शाळेतील इंग्रजी व मराठी माध्यमाच्या **इयत्ता २ री ते इयत्ता ९ वी** च्या विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसण्यास प्रोत्साहन द्यावे, ही विनंती.

परीक्षेची माहिती

**परीक्षेची तारीख:**
**१० नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५** दरम्यान शाळांच्या सोयीनुसार,शाळांच्या प्रांगणात
(सर्व नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी)
परीक्षेचे स्वरूप:
दरवर्षीप्रमाणेच वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ प्रश्न, लेखी
**नाव नोंदणीची अंतिम तारीख**: ३१ जुलै २०२५
**परीक्षेचे शुल्क**: रू.३००/- फक्त ( प्रत्येकाला मार्गदर्शक पुस्तिका,तसेच
'भाषा' कडून प्रत्येक विद्यार्थ्याला भेट म्हणून पुरवणी वाचन पुस्तक, आणि
प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र दिले जाते)
पहिल्या पातळीचे निकाल: जानेवारी दुसरा आठवडा
*मार्गदर्शक पुस्तिका व पुरवणी वाचन पुस्तक ऑगस्ट २०२५ मध्ये उपलब्ध होतील.

**दुसरी पातळी: 'मराठी 'भाषा प्रज्ञा' परीक्षा':**
भाषा व 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड'(MKCL) यांचा संयुक्त उपक्रम
आजच्या काळाची गरज लक्षात घेऊन भाषा व तंत्रज्ञान यांची सांगड घालून
विद्यार्थ्यांच्या भाषिक गुणवत्तेचा विकास साधण्यासाठी 'भाषा' संस्था व
'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड' च्या (MKCL) यांनी संयुक्तरीत्या उचलेले हे पाऊल आहे.
दुसऱ्या पातळीवरील परीक्षेची तारीख: जानेवारी अखेर **(फक्त इ.५ वी ते ९ वी
तील विद्यार्थ्यांसाठी)**

(पहिल्या पातळीतून प्रावीण्य व विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांसाठी )
**परीक्षेचे स्वरूप :** Online, वस्तुनिष्ठ, सोयीच्या MSCIT केंद्रावर
**बक्षीस समारंभ:** फेब्रुवारी२०२६
यातून पदकप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांची यादी (मेरिट लिस्ट ) जाहीर केली
जाईल आणि त्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी **'खास मार्गदर्शन उपक्रम' (मेंटॉरशिप प्रोग्रॅम)**

**विशेष सूचना :**
**याबद्दलची तपशीलवार माहिती यथावकाश पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येईल.**
**'भाषा प्रज्ञा पदक' मिळवण्यासाठी Online परीक्षा देणे विद्यार्थ्यांना**
**अनिवार्य राहील याची कृपया नोंद घ्यावी.**
तरी आपण आपल्या विद्यार्थ्यांना दोन्ही स्तरांवरील परीक्षांतून चांगल्या
क्षमतेने उत्तीर्ण होण्यासाठी उद्युक्त करावे, ही विनंती.
या प्रकल्पाची उपयुक्तता लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे या उपक्रमास सहकार्य
कराल, असा विश्वास आहे.

धन्यवाद.
**आपली,**
**स्वाती राजे**
**अध्यक्ष**
**भाषा फाउंडेशन,पुणे**